खानदेशांतील राष्ट्रीयपक्षाचें पहिलें व लोकप्रिय पत्र.

**प्राचीप्रभा**-साप्ताहिक बुध ( वर्ष ११ ) सं. आणि प्र. रामचंद्र पांडुरंग वैद्य, सेक्रेटरी सी. वि. केरकर, फोंडा, गोवें. वर्गणी वाचनालयांस रु. २-०-० इतरांस रु. ३-०-०.

राष्ट्रीय विचाराचें बाणेदार पत्र.

**प्राणिरक्षक**-मासिक ( वर्ष १ ) प्र. सखाराम विष्णु गुर्जर, प्राणिरक्षकसंस्था, चौक, आकोला वर्गणी सभासद वर्ग १ ते ४ ला फुकट, इतरांस रु. १-०-०.

गोरक्षणाचें महत्व लोकांस कळून खरें गोरक्षण व्हावें व सर्व प्राणिमात्रांस अभयदान मिळावें या हेतूनें निघालेलें हें पत्र खरोखरीच वाचनीय व संग्राह्य आहे.

**प्राथमिक शिक्षण**—पाक्षिक ( वर्ष १ ) प्र. शंकर नरहर जोशी परांजपेवाडा, पो. परिंचें, जि. पुणें. वर्गणी रु. २—०—०.

शिक्षकांना, शाळांना व पालकांना सर्व प्रकारची भरपूर माहिती पुरविणारें हें पत्र शिक्षण व शिक्षणपद्धति यांची सर्वांगांनी भरभराट कशी होईल याची मुद्देसूद चर्चा करतें.

**बकुल**—साप्ताहिक-रवि ( वर्ष २९ ) सं. आणि प्र. हरी धर्मराज गांधी, रत्नागिरी. वर्गणी रु १—८—०.

**बारामति समाचार**—साप्ताहिक शुक्र ( वर्ष ३ ) सं. आणि प्र. हरी अनंत जोशी, बारामती. वर्गणी रु. २ ८—०.

**बालोद्यान**—मासिक ( वर्ष ४ ) प्र. शंकर बळवंत सहस्रबुद्धे, ६८९ सदाशिवपेठ, पुणें. वर्गणी रु. २—०—०.

ह्या मासिकाचें बाह्यांग व अंतरंग लहान मुलांचे मनास आकर्षक करणारें असून त्यांस वाचनाची गोडी लावणारें आहे. मासिकांतील गोष्टी मनोरंजक व बोधप्रद असून टाइप मोठा आहे.

**बेळगांव-समाचार**—साप्ताहिक सोम ( वर्ष ५८ ) सं. आणि प्र. हरी भिकाजी सामंत, बेळगांव, वर्गणी रु. २—१३—०.

समतोल विचाराचें पत्र.

भंडारी–त्रैमासिक ( वर्ष ३ ) सं. आणि प्र. शामराव भिकाजी गोलटकर, नं. १६ झावबाची वाडी, मुंबई नं. २.

भंडारीविजय–मासिक ( वर्ष २ ) सं. धर्माजी कानूजी हिंदळेकर, प्र. भंडारी ज्ञानप्रकाशक समाज ५३ उप-रखार्डी, मुंबई, वर्गणी रु. २–०–०.

उपयुक्त विषयांची चर्चा करणारें मासिक. यांत भंडारी ज्ञातीच्या हितसंबंधाचे लेख देखील येतात.

भंडारी हितेच्छु–मासिक ( वर्ष २ ) सं. आणि प्र. कृष्ण मालोजी सिरदनकर, २ रा कुंभारवाडा, ४१–४५ मुंबई नं ४ वर्गणी रु. १–८–०.

भंडारी समाजास हितकर.

भगवाझेंडा–साप्ताहिक गुरु ( वर्ष १ ) सं. आणि प्र. दत्तात्रय यशवंत शिंदे ( कुरणे ) रिसालदानजीक, कोल्हापूर वर्गणी रु. ३–०–०.

ब्राह्मणेतरपक्षाचें पत्र.

भाग्योदय–मासिक ( वर्ष २ ) सं. के. मा. इनामदार स. सं. शं. ग. जोशी, मु पो. पळसगांव, जि. सातारा वर्गणी रु. १–१२–०.

ह्यांतील राजकीय, सामाजिक, नैतिक, धार्मिक, ऐतिहासिक, मनोरंजक व चर्चात्मक लेख भारदस्त असतात.

भारत–साप्ताहिक गुरु ( वर्ष ९ ) सं. आणि प्र. बाळकृष्ण राजाराम राजनेकर, अमरावती वर्गणी रु. २–८–०.

कोणत्याही प्रकाराच्या भेदभावास स्थल न देतां सत्यान्वेषण करणें हेंच या पत्राचें ध्येय आहे.

**भारत**–साप्ताहिक ( वर्ष ६ ) सं. आणि प्र. गोविंद पुंडलीक हेगडे, केपें, गोवा, वर्गणी रु. ३–८–०.

गोमांतकांतील राष्ट्रीय विचाराचें पत्र.

**भारतइतिहास संशोधक मंडळ**–त्रैमासिक ( वर्ष १ ) सं. दत्तो वामन पोतदार, बी. ए. व गंगाधर नारायण मुजुमदार, प्र भा. इ. सं. मंडळ पुणें वर्गणी रु. ३–०–०.

**भारतमाला**–पाक्षिक ( वर्ष १२ ) सं. आणि प्र. विष्णु सिताराम आठले, १९६१ इसलामपूर वर्गणी रु. १–८–०.

राष्ट्रीयपक्षाचें बाणेदार पाक्षिक.

**भारतोदय** मासिक ( वर्ष १ ) सं. गोविंद पुंडलीक हेगडे, प्र. हिंदुसमाज, रिवण ( गोवा ) वर्गणी रु. २–०–०.

हिंदुजनतेच्या मनांत देशी कलाकौशल्यादि उद्योगधंद्यांचें महत्व बिंबवून सेवावृत्तीविषयीं तिटकारा उत्पन्न करवा हें या मासिकाचें ध्येय आहे.

**भिषग्विलास**–मासिक ( वर्ष २७ ) सं. आणि प्र. महादेव रामचन्द्र रानडे, स. सं. गंगाधर गोपाळ गुणे (वैद्यपंचानन) घर नं. २०८९, सोलापुर, व. २–८–०.

**मकरंद**–मासिक (वर्ष १७) सं. आणि प्र. नरहर न. पटवर्धन, वाई. ( जि. सातारा ) वर्गणी रु. ३–२–०.

मनोरंजक कादंबऱ्याच प्रसिद्ध करणारें हें मासिक प्रत्येक वद्य प्रतिपदेस प्रसिद्ध होतें.

**मधुकर**-मासिक ( वर्ष ९ ) सं. आणि प्र. शंकर गणेश गोचिडे, ६११ वी. कुंभारवाडा, दादर, मुंबई. वर्गणी रु. ३-०-०

सचित्र व मनोरंजक मासिकपुस्तक. यांत दरमहा दोन गोष्टी, चालू कादंबरी, स्फूर्तिदायक लेख, मार्गदर्शक चरित्रें, चुरचुरीत टीका, हास्यकारक चुटके, मनोरंजक माहिती व रसाळ कविता येत असतात

**मध्वसिद्धांतसुधाकर**-मासिक ( वर्ष ३ ) सं. रंगाचार्य बाळकृष्णाचार्य रड्डी, प्र. श्रीमध्वसिद्धांत प्रचारिणी शाखा सभा, सदाशिवपेठ, पुणें. वर्गणी. ( अनिर्दिष्ट )

द्वैतासिद्धांतप्रतिपादक असल्यामुळें हें मासिक प्रत्येक सद्वैष्णवास संग्राह्य आहे.

**मनोरंजन**-मासिक ( वर्ष २७ ) सं. विठ्ठल सीताराम गुर्जर प्र. दत्तात्रय रघुनाथ मित्र, ३ सँढर्स्टरोड, गिरगांव, मुंबई. वर्गणी रु. ४-०-०.

महाराष्ट्रांतील कसलेल्या स्त्रीपुरुष लेखकांच्या लेखांनी युक्त असलेल्या या सचित्र व मनोरंजक मासिकपुस्तकांत दरमहा दोन तीन संपूर्ण गोष्टी, चालू कादंबरी, स्फूर्तिदायक लेख, आदर्शभूत चरित्रें, मनोहर प्रवासवर्णनें व रसाळ कविता इत्यादि विविध व बोधप्रद विषय असतात. ग्राहकांस वर्ष अखेर एक पुस्तक बक्षीस

**मराठामंडळ**-त्रैमासिक ( वर्ष २ ) सं. शं. वि. कदम कातरणीकर प्र. मराठा शिक्षणमंडळ, लष्कर, वर्गणी रु. १-२-०.

तरी हें मराठाशिक्षण परिषदेच्या सल्लागार मंडळाचें मुखपत्र आहे तरी यांत ऐतिहासिक, उपयुक्त व वाचनीय लेख येत असतात

**मराठामित्र**-मासिक ( वर्ष २ ) सं. आणि प्र. गोपाळ दाजीबा दळवी, महाल, नागपूर, वर्गणी रु. २-१२-०

**मराठी नवजीवन**-साप्ताहिक ( वर्ष १ ) सं. पुरुषोत्तम, बाळकृष्ण कुळकर्णी, प्र. अनंत जयाजी आवडे १९१ गिरगांव ब्याकरोड, मुंबई, वर्ग. रु. ४-१-०

महात्मा गांधीच्या गुजराथी नवजीवन पत्राचे भाषांतर

**मराठीशालापत्रक**-मासिक ( वर्ष ३२ ) प्र. शंकर नरहर जोशी चित्रशाळा, पुणें.

**मराठीशिक्षक**-मासिक ( वर्ष ११ ) सं. रामचंद्र गोविंद आपटे, प्र. ट्रेनिंग कॉलेज फॉरमेन, पुणें. वर्गणी रु. १-८-०

हें मासिक शिक्षकांना व शाळांना अवश्य ती सर्व प्रकारची माहिती पुरवितें.

**मल्लारिमार्तंड**-साप्ताहिक गुरु ( वर्ष ६ ) इंदूर, वर्गणी रु. ३-०-०.

होळकर संस्थानच्या प्रजाजनाच्या हिताहिताची चर्चा करणारें हें ( मराठी-हिन्दी ) साप्ताहिक होळकर संस्थानांतील चळवळी समजण्यास उत्तम साधन आहे.

**महाराष्ट्र**–साप्ताहिक बुध ( वर्ष ८ ) सं. आणि प्र. गोपाळ अनंत ओगले, बी. ए. घर नं. २७० सर्कल ३, नागपूर, वर्गणी रु. ३–८–०

वऱ्हाडांतील राष्ट्रीयपक्षाचें मुखपत्र.

**महाराष्ट्रसारस्वत**–त्रैमासिक ( वर्ष ६ ) सं. आणि प्र. ग. वि. लाड, लक्ष्मीभुवन, सँढर्स्ट रोड, गिरगांव, मुंबई, वर्गणी रु. १-८–०

सारस्वतज्ञातीसंबंधानें माहिती देण्यासाठीं या मासिकाचें अस्तित्व आहे. लेख माहितीनें भरलेले आणि अधिकारयुक्त असतात.

**महाराष्ट्रसाहित्य**-मासिक ( वर्ष ३ ) सं. आणि प्र. रा. गो. विरकुड, बी. ए, हनुमानबिल्डिंग, ग्रँटरोड, मुंबई. वर्गणी रु. ३–०–०

उच्च प्रतीच्या वाङ्मयास वाहिलेलें हें मासिक सामाजिक, ऐतिहासिक टीकात्मक निवडक लेखांनीं व सुंदर कवितांनीं अलंकृत असतें. बांधणी मजबूत व मुखपृष्ठ मोहक.

**माणिकप्रभु**–मासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. गणेश रघुनाथ कुळकर्णी, ५ कांकडवाडी, गिरगांव, मुंबई. वर्गणी रु. ४–०–० .

श्रीसद्गुरु मार्तंड माणिक प्रभु सं माणिकनगर ( निजामस्टेट ) यांच्या आश्रयाखालीं प्रसिद्ध होणारें हें मासिक

अबालवृद्धांस श्रीमाणिकप्रभु सांप्रदायाची माहिती करून देईल.

**मुमुक्षु**–मासिक ( वर्ष २ ) सं. आणि प्र लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए. पुणें वर्गणी रु. ३–०–०.

भक्तिमार्ग हा या मासिकाचा विशेष असून पूर्वीच्या साप्ताहिकाचें मासिकांत झालेलें हें रूपांतर वाचकांस खात्रीनें जास्त मान्य होईल.

**मूकनायक**–साप्ताहिक–शनि ( वर्ष २ ) सं. आणि प्र, ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप, १४ हरारवाला बिल्डिंग, पोयबावडी, परेल, मुंबई वर्गणी. रु. २–८–०

बहिष्कृत वर्गाच्या हिताहिताची जोरदार चर्चा करणारें पत्र.

**मोदवृत्त**–साप्ताहिक गुरु ( वर्ष ३२ ) सं. आणि प्र. दामोदर लक्ष्मण लेले, ३४३ मधली आळी, वाई वर्गणी रु. २–४–०.

**राजकारण**–साप्ताहिक रवि ( वर्ष ४ ) सं. आणि प्र. सीताराम केशव दामले, बी. ए. एल एल. बी. प्र. महादेव सखाराम दाते, १२१ शनिवारपेठ, पुणें वर्गणी रु. ३–०–०.

राष्ट्रीयपक्षाचें जोरदार व भारदस्त पत्र.

**रामदास आणि रामदासी**–मासिक ( वर्ष ७ ) सं. आणि प्र. शंकर श्रीकृष्ण देव, प्र. सत्कार्योत्तेजक सभा, धुळें वर्गणी रु. ३–०–०.

या मासिकांत वृत्त, चर्चा, जीर्णोद्धार, सांप्रदायिक विविध विषयांवर महत्वाचे लेख, ऐतिहासिक टांचणें, समर्थांची शिकवण, सांप्रदायिक कागदपत्रें व ग्रंथ येत असतात.

**राष्ट्रधर्म**- मासिक (वर्ष १) सं. आणि प्र. श्री. कृ. आण्णाशास्त्री अर्जुनवाडकर, १३०६ महादेवगल्ली, बेळगांव वर्गणी रु. ७-०-०.

पूर्ण राष्ट्रीय विचाराचें हें मासिक राष्ट्रधर्माची शिकवण स्फूर्तिदायक व ओजस्वी लेखद्वारा देत असतें. मासिकाच्या आरंभींच सुबोध व सरळ संस्कृत भाषेंत एक लेख देण्यांत येतो, त्यामुळें साधारण संस्कृत जाणणारांस त्याचा बराच उपयोग होतो.

**राष्ट्रवीर**-साप्ताहिक रवि (वर्ष १) सं. आणि प्र. शामराव संताजीराव भोसले, बी. ए. एल. एल. बी. बेळगांव वर्गणी रु. ३-४-०.

बेळगांव येथील ब्राह्मणेतर पक्षाचें मुखपत्र.

**लिंगायतधर्मप्रकाश**-मासिक (वर्ष १) सं. आणि प्र. श्रीविरूपाक्षस्वामि देशिकेंद्र महाराज, लातूर (निजामस्टेट) वर्गणी रु. २-८-०.

**लोकनायक**-साप्ताहिक शुक्र (वर्ष १) प्र. टी. वाय. पाटील, बोंगारवेस, १७४८ बेळगांव, वर्गणी रु. ३-८-०.

कर्नाटकांतील तरुण राष्ट्रीयपक्षाचें नवीन पत्र.

लोकमत–साप्ताहिक शुक्र ( वर्ष २ ) सं. आणि प्र. सदाशिव हणमंत बल्लाळ, यवतमाळ वर्गणी रु. ३–६–०.

लोकमान्य–दैनिक मंगळवार खेरीज ( वर्ष १ ) सं. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर बी. ए. प्र. लोकमान्य पब्लिशिंग कं. लि. नं. १२ वार्ड डी. गिरगांव, मुंबई वर्गणी मुंबइत रु. १३–८–० इतरत्र रु. १७–०–०.

मुंबई येथील राष्ट्रीयपक्षाचें बाणेदार व आठ पृष्ठांचें हें पत्र, प्रचलित सर्व विषयावरील माहितीनें ओतप्रोत भरलेलें असतें.

लोकमित्र–मासिक ( वर्ष ३१ ) सं. आणि प्र. दत्तात्रेय गोविंद सडेकर, खानापूर ( बेळगांव वर्गणी. रु. १–१०–०.

प्रसिद्ध लेखकांचे राष्ट्रीयप्रगतिसूचक स्वतंत्र व निर्भीड लेख देणारें मासिक.

लोकसंग्रह–दैनिक ( वर्ष ३ ) सं. आणि प्र. लक्ष्मण बळवंत भोपटकर, एम. ए. एल. एल. बी. नं. ४९८ वर्गणी रु. १३–०–०.

राष्ट्रीयपक्षाचें भारदस्त पत्र.

लोकसत्ता–साप्ताहिक शनि ( वर्ष १ ) सं. आणि प्र. विष्णु गणेश केळकर, ९२६, नासिक वर्गणी रु. ३–०–०.

लोकपक्षाचें साप्ताहिक.

वंजारीसमाचार–मासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र, शंकर गबाजी केकाणे, ३९–३७, लॅमिंग्टनरोड, मुंबई नं. ७ वर्गणी रु. १–१२–०.

**वंजारीत्रैमासिक**-( वर्ष ३ ) सं. आणि प्र. संभाजी नरसूजी कालेकर, लॅमिंग्टनरोड, मुंबई नं. ८ वर्गणी रु. १-१२-०.

**वऱ्हाडशालापत्रक**-मासिक ( वर्ष ४६ ) प्र. इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स, अमरावती वर्गणी रु. १-१२-०.

शाळांस व शिक्षकांस उपयुक्त,

**वर्ल्ड ॲडव्हर्टायझर**-मासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. दामोदर गोविंद भुसारी, २२४ सदाशिवपेठ, पुणें वर्गणी रु. ३-०-०.

सर्व प्रचलित विषयांची चर्चा करणारें विशेषतः जाहिरातींचें अँग्लो मराठी मासिक.

**वर्षफल**-वार्षिक ( वर्ष ७ ) वर्तक आणि प्र. वैद्य काशिनाथ भास्कर ओक, कल्याण वर्गणी रु. ०-८-६.

प्रत्येक व्यक्तीस आपला वर्षांतील काल कसा जाईल हें समजण्यासारखी या पुस्तकाची योजना आहे.

**विजय**-मासिक. जयागंज, ग्वाल्हेर वर्गणी रु. २-४-०.

ह्यांत मनोरंजक गोष्टी, सुरस कविता, सामाजिक लेख, विनोदी चुटके, व्यापार व उद्योगधंदे कूट प्रश्न इ. भरपूर भरणा.

**विजयीमराठा**-साप्ताहिक ( वर्ष २ ) सं. आणि प्र. श्रीपतराव लक्ष्मणराव शिंदे, २१ सोमवारपेठ, पुणें. वर्गणी रु. ३-२-०

विद्येंत मागासलेल्या सर्व समाजाच्या उन्नती कार्ती मार्मिक निर्भीड व जोरदार चर्चा करणारें महाराष्ट्राचें मुखपत्र.

चित्रावृत्त-पाक्षिक (वर्ष ४) सं. आणि प्र. नारायण लक्ष्मण जोग, श्रीरामप्रेस, त्रिटें. वर्गणी रु. १-४-०

विद्यार्थी साप्ताहिक (वर्ष २) सं. आणि प्र. नारायण चिंतामण गाडगीळ, २७ बुधवारपेठ, पुणें. वर्गणी रु. ३-८-०.

केवळ विद्यार्थ्यांनीं चालविलेलें असें नमुनेदार पण निःस्पृही व बाणेदार अशा धोरणाचें हें इंग्रजी मराठी साप्ताहिक आहे.

विद्याप्रसार-मासिक (वर्ष १) सं. आणि प्र. दामोदर लक्ष्मण लेले, मधली आळी, वाई. वर्गणी रु. ३-०-०.

विविधज्ञानविस्तार-मासिक (वर्ष ५२) प्र. नाडकर्णी आणी मंडळी साठी अनंत आत्माराम मारमकर ८१ फणसवाडी, मुंबई. वर्गणी रु. ३-०-०.

चरित्रें, प्राचिनसंशोधन, ऐतिहासिक लेख, पुस्तकपरीक्षण, विवेचनात्मक निबंध, वाङ्मयाविषयक चर्चा इत्यादि व इतर केवळ भारदस्त विषयांच्या भारदस्त चर्चेस वाहिलेलें मासिक. लेखकवर्ग कसलेला आणि विषयांची निवड कसोसीची. मासिकाच्या शेवटीं एक ‘ काव्यमंजूषा ’ व महाराष्ट्र-साहित्यपत्रिकेची पुरवणीही असते.

विवेक–मासिक ( वर्ष १ ) सं. आणी प्र. ए. एस. अणे-पनवर, नवाबाजार, वर्गणी रु. २–८–०

विजापुरांतील विद्यार्थ्यांनी सुरू केलेलें पहिलेंच सचित्र मासिक.

विश्वबन्धु–साप्ताहिक–रवि ( वर्ष ९ ) सं. आणि प्र. बळवंत कृष्ण पिसाळ, कोल्हापूर वर्गणी रु. ३–०–०.

ब्राह्मणेतरांचे पत्र.

विश्वब्राह्मणसमाजोन्नति–मासिक ( वर्ष १ ) सं. हरी गणेश पारखे, बी. ए. एल. एल. बी. प्र. विठ्ठल गानू सांगले, उत्तर कसबा, सोलापूर वर्गणी रु. २–०–०.

वृत्तसार–साप्ताहिक–सोम ( वर्ष २७ ) सं. आणि प्र. गोविंद गणेश वैद्य, घर नं. ४१८ वाई. वर्गणी रु. १–१३–०

वैद्यमित्र-मासिक ( वर्ष २ ) सं. आणी प्र. वैद्य रघुनाथ अनंतशास्त्री पटवर्धन ( आयुर्वेदमार्तंड ) मुगभाट क्रॉसलेन, मुंबई नं. २ वर्गणी रु. १–४–०.

वैद्यकाची सुबोध चर्चा करणारें हें मासिक जनतेंत आर्य वैद्यकाचा प्रसार होण्याकरितां सर्व वाचनालयांना मोफत देण्याची व्यवस्था केली आहे.

वैश्यधर्मोन्नतिमाला-मासिक ( वर्ष ३ ) प्र. गणपत विठोबा मोरे, महाजनवाडी, कांदेवाडी, मुंबई नं. ४.

व्यापारी—सप्ताहिक—रवि ( वर्ष २९ ) सं. आणि प्र. शंकर श्रीधर पारनाईक, रविवारपेठ, पुणें वर्गणी स्थानिक आगाऊ २ रु. मागाहून ४ रु. इतरत्र आगाऊ २–१४–० मागाहून ५ रु.

राष्ट्रीयपक्षाचें विशेषतः हिन्दी व्यापार विषयक जोरदार चर्चा करणारें पत्र.

व्यायाम—मासिक ( वर्ष ७ ) प्र. धोंडो नारायण विद्वांस, मुजुमदारांचा वाडा, रावपुरा, बडोदें. वर्गणी. रु. २–८–०.

व्यायामांत कुस्ती, मल्लखांब, जोडी डबल्बार, क्रिकेट वगैरे देशी विदेशी व्यायाम विषयक खेळांची व कसरतीची सचित्र माहिती देण्यांत येते. त्याशिवाय यांत आरोग्य, ब्रह्मचर्य व व्यायाम यांचे महत्व समजावून देणारे शास्त्रीय लेख, कविता व बातम्याही प्रसिद्ध होत असतात.

शाहू—साप्ताहिक बुध (वर्ष २२) सं. आणि प्र. विष्णु रामकृष्ण ढवळे, १९८ सोमवार पेठ. सातारा वर्गणी रु १–१३–०.

( श्री. ) शिवाजी—साप्ताहिक सोम ( वर्ष १ ) सं. आणि प्र. रामचंद्र काशिनाथ नाईक, बी. एस. सी. ९२९ शुक्रवारपेठ, पुणें. वर्गणी रु. ३–४–०

ब्राह्मणेतरांची व अस्पृश्यांची सामाजिक गुलामगिरी नाहींशी करणें व त्याबरोबरच राजकीय दृष्टया राष्ट्राची उन्नती करणें हें या पत्राचें ध्येय असून सामाजिक स्वातंत्र्य

व राजकीय स्वातंत्र्य या दोहोंचाही सारखाच निरपेक्षपणें पुरस्कार यांत होत असतो.

**शिक्षकमित्र**-मासिक ( वर्ष २ ) सं. आणी प्र. दत्तात्रय रामचंद्र चितळे सातारा. वर्गणी रु. २-५-०-

**शुभसूचक**-साप्ताहिक शुक्र (वर्ष ६३) सं आणि प्र. दत्तात्रय रामचंद्र चितळे, सातारा वर्गणी रु. २-५-०

**शेतकी**-आणि शेतकरी मासिक ( वर्ष १२ ) सं. कृष्णाजी सुभराव कुळकर्णी, बी. एजी. प्र. डेक्कन ॲग्रिकलचरल असोसिएशन, पुणें. वर्गणी रु. १-२-६.

यांत हिंदुस्थानांतील विशेषतः महाराष्ट्रांतील शेतकी व वागाइत यांच्या सद्यस्थिति व सुधारणें संबंधी तज्ज्ञनी लिहिलेलें असे महत्वाचे लेख असतात.

**शैवब्राह्मण**-त्रैमासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. महादेव गोविंद भोजने, ब्राह्मणशाही, वाई. जि. सातारा, वर्गणी रु. १-०-०.

**संजीवन**-पाक्षिक, सं. दत्तात्रय भिमाजी रणदिवे, वेताळ, पेठ, पुणें. वर्गणी रु. २.

ब्राह्मणेतर पक्षाचें पत्र.

**संजिवन**-मासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. रामकृष्ण दीक्षित, केळीबाग, नागपूर, वर्गणी रु. ३.

**( श्री ) संतशिवाजीमहाराज**-पाक्षिक ( वर्ष १ ) सं. शंकर त्र्यंबक आवटे, पुणें. वर्गणी रु. १-१०-०.

राष्ट्रीय मराठापक्षाचें पत्र.

**सत्यप्रकाश**-साप्ताहिक-रवि ( वर्ष ३ ) सं. आणि प्र. रा. ना. विभूते, शनिवारपेठ, सातारा, वर्गणी रु. १-१३-०.

ब्राह्मणेतर व विशेषतः सत्यशोधकसमाज पक्षाचें पत्र

**सत्यशोधक**—साप्ताहिक रवि ( वर्ष ५० ) सं. आणि प्र. दत्तात्रय हरी लिमये, बी. ए. एल. एल बी. रत्नागिरी वर्गणी रु. २-१३-०.

सत्यशोधकसमाज या नावानें प्रसिद्ध असलेल्या समाजाशी या पत्राचा कांहीएक संबंध नसून सहरहु पत्र एक वर्णाश्रमधर्मवादी चित्पावन ब्राह्मण गृहस्थ काढीत असतात.

**समाजसेवक**—मासिक (वर्ष २) सं. नारायण मल्हार जोशी. बी. ए. वगैरे प्र. गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे, बी. ए. सोसल सर्विस लीगचें ऑफीस, सॅन्डहर्स्ट रोड, गिरगांव, मुंबई. समाजसेवा संघाच्या भासदांस फुकट, इतरांस वर्गणी रु. ३-०-०.

हें सामाजिक व समाजसेवाविषक अनेक महात्वाच्या प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मासिक आहे.

**सयाजीविजय**–साप्ताहिक रवि ( वर्ष ३० ) प्र. मधुसूदन दिनानाथ दळवी, धि नॅशनल डेमोक्रॅटिक पब्लिशिंग कं. लि, ३८८ ठाकुरद्वारा, गिरगांव, मुंबई, वर्गणी मुंबई व बडोदें येथें आगाऊ रु. ३ इतर रु. ३-१३-०

सयाजीविजय जवळ पक्षपात नाहीं. देशांतील सर्व समाज त्याचे देशबांधव आहेत व तो सर्वांचें हित इच्छिणारा आहे. सर्व बाजूच्या बातम्या सयाजीविजय मध्यें दिल्या जातात.

**सरकारी कामगार समाचार**–साप्ताहिक ( वर्ष १ ) प्र. सेक्रेटरी खडकीकामगारसंघ, ७५०, कसबा, पुणें वर्गणी रु. २

हें पत्र सर्व प्रकारच्या सरकारी नोकर लोकांच्या हिता-साठीं, हक्कांसाठीं, पगार वाढीसाठीं व त्यांची दुःखें नाहींशी करण्यासाठीं सुरू झालें आहे.

**सहकारी नामदेव**-पाक्षिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. पंढरीनाथ नारायण पाटसकर, ४९ निहालपेठ, पुणें. वर्गणी रु. १-८-०

**सहकारी मित्र**—मासिक (वर्ष २) सं. गोपाळ कृष्ण देवधर, एम. ए. व. इतर प्र. बॉम्बे सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह इंस्टिटयूटची महाराष्ट्र शाखा, बुधवारपेठ, पुणें वर्गणी रु. १-६-०.

यांत सहकारी संस्था व पतपेढ्या संबंधी उपयुक्त माहिती येत असते.

**साईनाथ प्रभा**—मासिक सं. लक्ष्मण बळवंत पेठकर बी. ए. एल. एल. बी. १९ अ. कसबापेठ, पुणें वर्गणी रु. १-०-०.

धार्मिक विषयांची चर्चा करणारें मासिक.

**सुबोधपत्रिका**-साप्ताहिक-रवि ( वर्ष ५१ ) सं. द्वारकानाथ गोविंद वैद्य, प्र. प्रार्थनासमाज, गिरगांव, मुंबई वर्गणी रु. ३-८-०

ज्यानें हें जग उत्पन्न केलें तो परमेश्वर एक आहे, तो नित्य, ज्ञानस्वरूप, निरवयव व पतितपावन असा आहे, त्यास अनन्यभावें शरण जाऊन त्यास प्रिय अशी कृत्यें करणें हीच त्याची खरी उपासना होय. मूर्ति व इतर जड

पदार्थ यांची पूजाप्रार्थना करणें हा ईश्वरोपासनेचा खरा प्रकार नव्हे, परमेश्वर सावयव रूपानें अवतार घेत नाहीं व कोणताही एक ग्रंथ ईश्वर प्रणीत किंवा सर्वांशी प्रमाण नाहीं वगैरे प्रार्थसमाजाचीं मुख्य तत्वें आहेत व यांस अनुलक्षूनच सदरहु पत्राचे लेख असतात.

**सुबोधमाला**–मासिक ( वर्ष ६ ) सं. आणि प्र. नीलकंठ सदाशिव देखमुख, वर्धा वर्गणी रु. २-८-०

राजकीय, सामाजिक इत्यादि विषयांची निर्भिड चर्चा करणारें मासिक.

**सुमंत**-साप्ताहिक-सोम ( वर्ष २५ ) सं. आणि प्र. पांडुरंग बळवंत कोल्हापुरे, कऱ्हाड, वर्गणी रु. २-५-०

राष्ट्रीयपक्षाचें पत्र,

**सुवर्णकार उदय**–मासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. विनायक गोविंद पिसाट, घर नं. १४, २ री खत्तरगल्ली, मुंबई वर्गणी ०-८-०

सुवर्णकारांच्या हिताबद्दल चर्चा करून त्यांची मानसिक नैतिक, सामाजिक व सांपत्तिक स्थिति कशी सुधारेल इकडेच हें मासिक प्राधान्येंकरून लक्ष पुरवितें.

**सुवर्णकार विजय**–पाक्षिक ( वर्ष १ ) मुंबई वर्गणी रु. ०-८-०

हें दैवज्ञसमाजाच्या उन्नतीप्रीत्यर्थ निघालें आहे.

**सुविचार माला**–मासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. महादेव रंगनाथ कुळकर्णी, वडूज, जि. सातारा वर्गणी रु. २-४-०

**मुशमित्र**–मासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. मनीराम बालचंद परदेशी, विजापूर, वर्गणी रु. २-८-०

विजापुरांतील राष्ट्रीय विचाराचें निर्भीड मासिक.

**सोलापूर समाचार**–साप्ताहिक मंडळ (वर्ष ३७) सं. आणि प्र. विठ्ठल नरसय्या जक्कल, ३४० शुक्रवारपेठ, सोलापूर वर्गणी रु. १-१३-०

**स्वकुळ साळीविजय**–मासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. भाऊराव रंगोबा पांडकर, घर नं. ८२० बारामती, वर्गणी रु. २-४-०

हें विणकर समाजाच्या उन्नती करितां निघालें आहे.

**स्वधर्म**–साप्ताहिक-गुरु ( वर्ष १ ) प्र. शंकर नरहर जोशी, १०२६ सदाशिवपेठ, पुणें वर्गणी रु. ३-१३-०

श्रीमज्जद्गुरु शंकराचार्य पीठ करवीर-संकेश्वर यांचे मठामार्फत राजकीय, व सामाजिक विषयांचे धार्मिक दृष्टीनें विवेचन करणारें महाराष्ट्राचें मुखपत्र.

**स्वयंसेवक**–मासिक ( वर्ष ३ ) सं. वि. का. प्रियोळकर, प्र. रामचंद्र मंगेशराव, फोंडा-गोवा वर्गणी रु. २-८-०

यांतील लेख उपयुक्त आणि विचारपरिप्लुत असून लेखक वर्गांतली बरीच मंडळी नांवाजलेली आणि कसलेली आहे.

**स्वराज्य**–साप्ताहिक-( वर्ष २ ) सं. आणि प्र. शिवराम महादेव परांजपे, एम. ए. ६ शुक्रवारपेठ, पुणें वर्गणी रु. ३-१३-०

राष्ट्रीयपक्षाचें बाणेदार व भारदस्त पत्र.

**स्वध्याय**-मासिक ( वर्ष १ ) सं. धुंडिराज गणेश दीक्षित, प्र. श्रीपाद् गोविंद वखे, २८६ सदाशिवपेठ, पुणें वर्गणी रु. ६-८-०

यांत धार्मिक व सामाजिक विषयांवर सप्रमाण प मुद्देसूद लेख येत असतात.

**हिन्दुमिशनरी**-साप्ताहिक-सोम ( वर्ष ४ ) सं. आणि प्र. सुंदरराव भास्कर वैद्य एल. एम. ई., ठाकुरद्वार, मुंबई नं. २

या इंग्रजी-मराठी पत्रांत मिशनरी हिंदुधर्मांची व हिन्दु मिशनरी सांप्रदायाची माहिती असते.

**क्षत्रिय**-दाशाहिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. गोविंद बळवंत वाकळे, सोलापुर. वर्गणी रु. ३-६-०

ब्राह्मणेतरांचें नवीन पत्र. यांत राजकीय, सामाजिक व शिक्षण विषयक प्रश्नांवर स्वतंत्र व बाणेदार लेख प्रसिद्ध होतात.

**क्षत्रियमाळी पुढारी**-मासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. मोतीराम तुकारामजी वानखडे, करजगांव, ( वऱ्हाड ) वर्गणी रु. २-४-०

वऱ्हाड आणि मध्यप्रांत क्षत्रियमाळी शिक्षणसंस्थेच्या आश्रयाखाली प्रसिद्ध होणारें क्ष. मा. शि परिषदेचें मासिक

**क्षत्रिमाळी सैनीमित्र**-मासिक ( वर्ष १ ) सं. गणपत सूर्यभानजी भुयार, अमरावती ( वऱ्हाड ) वर्गणी रु. २-०-०

माळी ( सैनी ) जातींतील अविद्येचा नाश करण्या करितां व बंधुभाव व समानता यांचा आपल्या जातिबांधवांस संदेश सांगण्या करितां हें मासिक निघालें आहे.

**क्षात्रदूत**–त्रैमासिक ( वर्ष १६ ) सं. आणि प्र. मुकुंद जनार्दन गोरेगांवकर, गांवदेवी, मुंबई वर्गणी ( अनिर्दिष्ट )

पाठारे क्षत्रिय ज्ञातीकरितां

**क्षात्रवृत्त**–मासिक ( वर्ष १ ) सं. आणि प्र. शांताराम ज. पाठारे दादर, मुंबई वर्गणी रु. १-८-०

**ज्ञानप्रकाश**–दैनिक ( वर्ष ७४ ) सं. आणि प्र. अनंत विनायक पटवर्धन बी. ए., बुधवारपेठ, पुणें वर्गणी पुणें व मुंबई येथें रु. ८-०-० इतरत रु. १२ ०-०

नेमस्तपक्षाचें समतोल विचाराचें भारदस्त पत्र.

**ज्ञानसागर**–साप्ताहिक-सोम-( वर्ष ४२ ) सं. आणि प्र. विष्णु विठ्ठल मंत्री, गंगावेशीनजीक, कोल्हापूर वर्गणी रु. १-१३-०

राष्ट्रीयपक्षाचें पत्र.

**ज्ञानोदय**–साप्ताहिक ( वर्ष ८० ) सं. रेव्ह. ए. एच. क्लार्क एम. ए , भायखळा, मुंबई वर्गणी रु. १-१३-०

खिस्ती मिशनरी सोसायटीचें पत्र.

# मराठा-मंडळ.

त्रैमासिक.

ग्वाल्हेर येथें प्रसिद्ध होतें. एक वर्ष संपून दुसरें वर्ष सुरू झालें आहे. जरी हें मराठा-शिक्षण-परिषदेच्या सल्लागार मंडळाचें मुख पत्र आहे तरी यांत ऐतिहासिक उपयुक्त व वाचनीय लेख येत असल्यामुळें व कोणत्याही पक्षाशीं याचा संबंध नसल्यानें हें सर्व महाराष्ट्र वाचकांचे स्तुतीस पात्र झालें आहे. कर्नल नानासाहेब शिंदे. बडोदा आर्मी यांचा अत्यंत सुंदर लेख, पानपतच्या घनघोर संग्रामाचा युद्धशास्त्रीय दृष्टया विचार नकाशासह पहिल्या वर्षाचे चौथ्या अंकात समग्र आला आहे. पहिला व तिसरा अंक सचित्र आहे. चारही अंकाची किं ट. ख. सह रु. १-४-० असून प्रति थोड्या शिल्लक आहेत. करितां पहिल्या वर्षाचे अंक मागविण्याची व नवीन वर्गणीदार होण्याची त्वरा करावी.

| | |
|---|---|
| मराठा-मंडळ-आर्यालय<br>लष्कर ग्वाल्हेर.<br>ता. २०-१२-२१ | शं. वि. कदम कालरणीकर.<br>संपादक, मराठा-मंडळ |

---

शास्त्रीय विषयांची गोडी लावून देणारी

# बालवाङ्मयमाला.

शास्त्रीय विषयांची हंसतखेळत माहिती करून देण्यासाठीं, ही माला अगदी नवीन धर्तीवर काढली असून, विद्यार्थी व सामान्य ज्ञानेच्छु स्त्रीपुरुष यांच्या उपयोगासाठीं शास्त्रीय विषयांचा ज्ञानकोश निर्माण करणें हा तिचा उद्देश आहे. चित्ताकर्षक भाषा, भरपूर चित्रें, सुबक छपाई आणि मनोवेधक बाह्यांग व अंतरंग या गोष्टी साधण्याकडे विशेष लक्ष पुरविलें आहे. दरपुस्तकाची पृष्ठसंख्या आजमासें ७०. किं. दहा आणे. ट. ख. निराळा. माहीतीपत्रक फुकट. दुकानदारांस सवलत. एजंट पाहिजेत. या मालेंतून निघालेली पुस्तकें:—

१ **हवेंतील चमत्कार**–ले. वि. अ. ठोंबरे एल्.एल्. बी.

२ **तेजोनिधि सूर्य**–ले. स. वा. देशपांडे बी. ए.

३ **वैभवशाली विजयनगर**–ले. य. अ. ठोंबरे बी. ए.

४ **शरीरांतील आश्चर्यकारक भाता.** ले. वि. अ. ठोंबरे.

" **वसाहतींचें स्वराज्य** " किं. दीड रुपाया, **श्री. न. चिं. केळकर.** यांच्या प्रस्तावनेसहित, लेखक रा. ठोंबरे हें पुस्तकहि आमच्याकडे मिळेल.

**बालवाङ्मयप्रसारक मंडळ,**

[illegible] पेठ, **पुणें.**

मराठी ग्रंथ संग्र...
नं.
ता.
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. २००

शिक्षणविषयक कळकळीनें पूर्वीच उपक्रम करून फार मेहनतीनें
हल्लीं पूर्ण केलेला

महाराष्ट्र-भाषानैपुण्यास अत्यावश्यक
प्रौढ विद्यार्थी, शिक्षक व सामान्य वाचकांसही अत्यंत उप[योगी]

# मराठी भाषेचा वज्रकोश.

प्रचलित मराठी गद्यपद्यभाषेस साजेसा

(कठीण शब्दांचा अनेकार्थदर्शक संग्रह.)

पृष्ठसंख्या सुमारें ६००. शब्दसंख्या २००० पर्यंत.

आकार नवीन गीता-रहस्याचा. पायका टाईप.

सुंदर छपाई. मजबूत बांधणी.

पुणें ट्रेनिंग कॉलेजचे माजी प्रिन्सिपाल रावबहादुर काशिनाथ नारायण साने व रिटायर्ड डे. ए. इन्स्पेक्टर रा. गोपाळ व्यंकटेश पाणंदीकर वगैरे शिक्षणखात्यांतील तज्ज्ञांचे व इतर विद्वानांचें उत्तम अभिप्राय मिळाले आहेत.

**मराठी-भाषाभिमान्यांच्या सहानुभूतीची अपेक्षा आहे.**
व्यापारी हेतू नसल्यामुळें किंमत शक्य तितकी कमी ठेविली आहे.

साधी बांधणी किं. रु. ४-०-०

सोनेरी नांवाची बांधणी किं. रु. ४-८-०. ट. ह. निराळा.

पत्ता:-६९ अमरवाडी, खत्तरगली गिरगांव मुंबई.

गोपाळ बजाबा जोशी, महाडकर.
पेन्शनर हेडमास्तर, जि. कुलाबा.

## आमचीं इतर उपयुक्त पुस्तकें.

**सुलभ शिक्षण**—माजी लोक शिक्षणांत प्रसिद्ध झालेला वाचनावरील हा नवीन तऱ्हेचा उत्कृष्ठ निबंध शाळेंतील शिक्षणास मुकलेल्या तरुणानें अवश्य वाचावा किं. ४ आणे.

**भारतनियतकालिकदीपिका**—हिंदुस्थानांतील, इंग्रजी, गुजराथी, उर्दू, बंगाली, व हिंदी, वगैरे वर्तमान पत्रें व मासिक पुस्तकें यांची संपूर्ण माहिती देणारें उपयुक्त पुस्तक किं. ६ आणे.

**मराठी स्त्री लेखकांची सूचि**–गृहिणी रत्नमालेंतून प्रसिद्ध झालेली ही महत्वाची सूचि स्वतंत्र पुस्तक रुपानें विक्रीस तयार आहे. यांत अदमासे ३०० स्त्री लेखकांची नांवें त्यांच्या ग्रंथांच्या, कवितेच्या व लेखाच्या नांवासह संग्रहित केली आहेत किं. ४ आणे

पत्ता—

गणेश रंगनाथ दंडवते.
रावपुरा बडोदें.

---

**शान्ति, पुष्टी आणि तुष्टिवर्धक**
**तुपांतील सर्वोत्कृष्ट चिवडा**

आमचाच असें चिवड्याचा स्वाद घेतल्यावर प्रत्येकास वाटतें. किं. रतलास १४ आ. ट. ख. निराळा.

**दामोदर सखाराम डोंगरे.**
उदबत्त्यांचे व्यापारी,
**राजमहाल रोड, बडोदें.**

सरकारीशाळ.खात्यांनें प्राथमिक व दुय्यम मदरश्या व ट्रेनिंग कॉलेजें यांस बक्षिसाकरितां व लायब्ऱ्यांकरितां मंजूर केलेलें

# प्रगति.

हें आपल्या नांवाप्रमाणें तरुणांच्या सुप्त शक्तीस खडबडून जागें करून त्यांस प्रगतिपथास लावणारें स्वावलंबनेल ग्रमालेंतील अद्वितीय पुस्तक प्रत्येकाच्या संग्रहीं असणें अनिवार्य आहे. अवश्य आणि आजच मागवा. किं. १२ आणे ट. ख. निराळा.

## 'प्रगति' वरील कांहीं अभिप्राय.

**ज्ञानप्रकाश**— हायस्कुलांत व कॉलेजांत शिकत असलेल्या व त्यांतून नुकत्याच बाहेर पडणाऱ्या व पडलेल्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीस टणकरणा आणून त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची ज्योत उत्पन्न करण्यास हें पुस्तक बरेंच उपयोगी पडेल असें वाटतें.

**आनंद**—पुस्तक तरुणांच्या मनांत जागृति व निराश झालेल्यांच्या अंतःकरणांत आशेचा संचार करविणारें आहे.

**उद्यम**—'प्रगति' या पुस्तकांतील बहुतेक लेख विशेषतः प्रवासकार्य, रूढिविनाशन, सामर्थ्यसंचय आणि प्रसन्नता हे लेख तरुण पिढीस मनन करण्यायोग्य आहेत. भाषा उत्तेजक आहे,

**Modern Review**:—The book ought to find it way into the hands of every Deccani youth who means to get on the world. It Supplies the proper stimulus to guide his thoughts and shape his future career.

पत्ता-गणेश रंगनाथ दंडवते,
रावपुरा बडोदें.